# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असुन महानगरपालिकेचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच राज्यशासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेशानुसार करण्यात येते. शहरातील रहिवाशांना विविध सेवा सुविधा पुरविणे, रहीवाशांचे राहणीमान व शहरातील सुविधांचा दर्जा उंचविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम व योजना आखून त्यांची अंमलबजावणी करण्यात येत असते. त्याचप्रमाणे राज्य व केंद्र शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना व आदेशानुसार विविध योजना/उपक्रम व अभियान हे महापालिकेमार्फत राबविण्यात येत असतात.

राज्य व केंद्र शासनामार्फत महानगरपालिकांसाठी विविध अभियान, उपक्रम व योजना राबविणे विविध स्पर्धेत भाग घेणे या कामांतर्गत मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी विहीत वेळेत करणे, आवश्यक माहीती जमा करुन विहीत नमुन्यात शासनास सादर करणे, विविध शासकीय यंत्रणा तसेच महानगरपालिकेचे विविध विभागांशी समन्वय साधुन मुदतीत कार्यवाही करण्याची आवश्यकता असते. सद्यस्थितीत सदर नमुद कामे करण्यासाठी महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत स्वतंत्ररीत्या आवश्यक असणारा मनुष्यबळ बाह्यमार्गाने घेऊन त्यांच्यामार्फत विविध अभियांना संबधित अंमलबजावणी करण्यात येते. यासाठी स्वच्छ भारत अभियान, सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज, माझी वसुंधरा अभियान, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम संबंधित विभागांनी स्वतंत्र सल्लागार नियुक्त केलेले असल्याने समन्वयाचा अभाव दिसून येत होता त्यामुळे कामांना विलंब होऊन मनुष्यबळावर देखिल जास्तीचा खर्च होत असतो. या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सर्व विभागांचा एकत्रित समन्वय साधुन अभियानाची तसेच विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून "नाविन्यता कक्षाची" स्थापना करण्यात आली आहे.

मिरा -भाईंदर महानगरपालिकेत स्थापन करण्यात आलेल्या नाविन्यता कक्षाने शाश्वत विकासाला गती दिली असून मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे लोकसत्तेच्या लेखातील दाव्यांचा विपरीत नाविन्यता कक्ष हा आर्थिक बोजा नसून शहराच्या प्रगतीचा महत्त्वाचा घटक ठरत आहे. पेयजल सर्वेक्षणात नाविन्यता कक्षाच्या कठोर परिश्रमांमुळे महापालिकेस राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त झाला असून हा सन्मान भारताचे माननीय राष्ट्रपती यांच्याकडून प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील मोजक्या शहरांमध्ये मिरा-भाईंदर शहराचा समावेश आहे ज्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे.

माझी वसुंधरा अभियानात नाविन्यता कक्षाच्या पुढाकारामुळे महापालिकेला राज्य स्तरावर मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते ११ कोटी रुपयांचे बक्षीस प्राप्त झाले आहे. राज्यामध्ये माझी वसुंधरा अभियान मध्ये प्रथम येण्याचा मान या शहराला मिळाला आहे, यामध्ये नाविन्यता कक्षातील सदस्यांची अतिशय परिश्रम असून त्याचाच परिणाम म्हणजे सलग दोन वर्ष वसुंधरा अभियानामध्ये राज्य स्तरीय पुरस्कार मिळत आहे. राज्यामध्ये समान प्रकारच्या युनिट्स आणि सेल/कक्ष कार्यरत आहे, जसे प्रोजेक्ट मॅनेजमेंट यूनिट्स (PMUs), विविध शहरी स्थानिक संस्था (ULBs) मध्ये योजनेवर आणि विविध प्रकल्पांवर भारतभर कार्यरत नियुक्त केलेले आहेत, ज्यांचा स्वच्छ भारत मिशन (SBM) आणि इतर योजनेवर सल्ला आणि सक्रिय सहभाग असतो. महापालिका नाविन्यता कक्षाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे त्याचे व्यापक उद्दिष्ट रचना आणि कार्यक्षेत्र. स्मार्ट सिटीमध्ये रूपांतराच्या दिशेने मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाला सहाय्य करण्यासाठी नवीनतम आणि भविष्यकालीन उपाययोजना लागू करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेले इनोवेशन सेल, "मिरा-भाईंदर @2047" च्या दृष्टीकोनाशी जुळते आणि भारताच्या १०० व्या स्वातंत्र्य वर्षानिमित्त विकसित भारत' या व्यापक दृष्टीकोनाशी

जुळते. नाविन्यता कक्ष महापालिकेच्या सर्व विकासाच्या प्रयत्नांना, रणनीतिक नियोजनाला आणि प्रशासनाला निर्णय घेण्यासाठी डेटा-आधारित शिफारसी देण्यासाठी ऊर्जा केंद्र बनत आहे. यामुळे संपूर्ण प्रशासनात कार्यक्षमता आणि जबाबदारीत वाढ झाली आहे. सेलच्या सततच्या पाठपुरावा, निरीक्षणे आणि रणनीतिक सल्ल्यांमुळे सर्व उपक्रम प्रभावीपणे आणि पारदर्शकतेने राबवले जातात.

नाविन्यता कक्षाला महापालिका प्रकल्प, विविध अभियान आणि उपक्रमांचे निरीक्षण, मूल्यांकन आणि पुनरावलोकन करण्याचे कार्य सोपवलेले आहे. विविध विभागांसोबत समन्वय साधून, सहकार्य करून, कार्यक्षमता आणि प्रभावीपणा वाढवण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय आणि शिफारसी देण्यात येतात. विजिलन्स विंगच्या सहाय्याने महापालिका विभागाच्या कामात सुसूत्रता आणण्यास मदत होत आहे तसेच नागरिकांच्या तक्रारींवर विभागामार्फत 24 तासाच्या आत कारवाई करण्यात येत आहे. कक्षामार्फत १२ प्रमुख मिशन्स/अभियानांचे एमआयएस आणि अंमलबजावणी चे नियोजनाचे कार्य करते. यामध्ये स्वच्छ भारत मिशन, कचरा मुक्त शहरं (GFC), माझी वसुंधरा अभियान, वॉटर प्लस, पेयजल सर्वेक्षण, जलशक्ती अभियान, पीएम गतिशक्ती, शहर सौंदर्यीकरण स्पर्धा, मिशन लाईफ, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP), सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज, NAMASTE या सर्व अभियानाचा प्रामुख्याने समावेश आहे. या अभियानांमध्ये महानगरपालिकेचा सहभाग सतत वाढत असून राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर मिरा-शहराला या अभियानामध्ये नामांकने प्राप्त होत आहेत.

नाविन्यता कक्षाने धोरणांमध्ये सक्रिय सहकार्य साठी नीती आयोग, भारत सरकार यांचे सोबत सामंजस्य करार करण्यात महत्वाची भूमिका निभावली आहे. यासोबतच विविध प्रकल्पांच्या तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी आयआयटी मुंबई सारख्या जागतिक संस्थेसोबत करार करण्यास पुढाकार घेतला. महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र शासन यांच्यासारख्या प्रतिष्ठित संस्थांसोबत यशस्वी भागीदारी स्थापित केली आहे. हे सहकार्य शाश्वत विकास आणि नाविन्यपूर्णतेच्या प्रति सेलच्या वचन बद्धतेचे प्रतीक आहेत. नाविन्यता कक्षाच्या पुढाकाराने आगाखान एजन्सी फोर हॅबिटॅट इंडिया - पर्यावरण उपक्रमांसाठी, बिसलेरी - पर्यावरणीय उपक्रमांसाठी महिला स्वच्छता कर्मी, चाइल्ड हेल्प फाउंडेशन - शिक्षण आणि आरोग्य उपक्रमांसाठी, मेकिंग द डिफरन्स - विविध क्षेत्रीय उपक्रमांसाठी, अमलगम बायोटेक - कचरा व्यवस्थापन आणि मलजल उपचार उपायांसाठी, रिसिटी आणि रिसायकलिंग - कचरा व्यवस्थापन उपक्रमांसाठी, रिसायकल- घनकचरा नाविन्यता प्रकल्प या विविध संस्थांचा विविध प्रकल्पांमध्ये सीएसआर अंतर्गत सहकार्य मिळत आहे.

नाविन्यता कक्षाने महापालिकेसाठी मोठ्या प्रमाणात बचत केली आहे. विविध उपक्रमांद्वारे आणि कार्यक्षम व्यवस्थापनाद्वारे नाविन्यता कक्षाने महानगरपालिकेसाठी रु. 10 कोटींपेक्षा जास्त रक्कम बचत आणि नवीन उपक्रम आतापर्यंत राबवली आहे. नाविन्यता कक्षाच्या साहाय्याने महापालिकेचा DPR प्लॅन खाजगी संस्थांच्या माध्यमातून न बनवता नाविन्यता कक्षाच्या टेकनिकल टीमच्या साहाय्याने बनवण्यात येत आहे जेणेकरून अतिरिक्त खर्च टाळण्यात शक्य होत आहे. नाविन्यता कक्ष महापालिकेसाठी उत्पन्न वाढवण्यासाठी सक्रियपणे कार्य करत आहे. नागरिकांच्या सुरक्षा आणि सुरक्षेच्या प्रयत्नांवर वाहतूक गतीशीलता आणि आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आणि कार्यशाळांवर नाविन्यता कक्षाने लक्ष केंद्रित केले आहे. नाविन्यता कक्षाने विविध क्षेत्रांमध्ये विकास प्रकल्प सुरू करण्यासाठी सीएसआर निधी उभा करण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे आणि भविष्यात देखील पुढाकार घेत आहे. ज्यामुळे महापालिकेच्या आर्थिक तिजोरीवरचा भार कमी झाला आहे. या प्रयत्नांमुळे आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया, बिसलेरी व अमलगम बायोटेक या संस्थांसोबत यशस्वी सीएसआर सहकार्य केले गेले आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून स्थापित करण्यात आलेला नाविन्यता कक्ष हा मिरा भाईंदर शहराला अधिक चांगले, कार्यक्षम आणि शाश्वत बनविणे या महापालिकेच्या धोरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे. वृत्तपत्र प्रतिनिधी यांना नाविन्यता कक्षाच्या आपल्या समुदायाच्या झालेल्या सकारात्मक प्रभावाचा आणि संपूर्ण परिपक्षाचा विचार करण्याचे आवाहन करतो. कक्षाचे प्रयत्न मिरा भाईंदर शहर व नागरिकांच्या भल्यासाठी समर्पित आहे आणि भारताच्या विकासाच्या व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.